# जीवनातील व्यवहाराला नैतिक अधिष्ठान गरजेचे

## डॉ. दिगंबर नेटके : देगलूरला पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ



**देगलूर :** येथील महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

देगलूर, ता.२ (बातमीदार) : जागतिकीकरणाला वेग आल्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रातही काळानुसार अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. प्राप्त ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे अत्यंत आवश्यक असून शिक्षकांनी सेवाभाव ठेवून अध्यापन केल्यास समाजाची उन्नती होईल. माणसाच्या जीवनातील प्रत्येक व्यवहाराला नैतिक अधिष्ठान महत्त्वाचे असल्याने विद्यार्थ्यांनी भावी काळात वाटचाल करताना आपली क्षमता व मर्यादा लक्षात घेऊन वाटचाल केली पाहिजे. असे प्रतिपादन डॉ. दिगंबर नेटके यांनी केले.

देगलूर महाविद्यालयात पदवी प्रमाणात वितरण सोहळा शुक्रवारी (ता.एक) रोजी पार पडला. यावेळी समारंभाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके, डॉ. एम. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. मोहन खताळ यांनी केले. यावेळी जनार्धन चिद्रावार, रवींद्र द्याडे, देवेंद्र मोतेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, डॉ. संजय पाटील, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. किशन सुनेवार, डॉ. सुदाम लक्ष्मणकुमार, श्री राजू जंगीलवार उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर लक्षटे यांनी केले तर आभार डॉ. विनय भोगले यांनी मानले. यावेळी एकूण ९४० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यशस्वीतेसाठी डॉ. माधव चोले, डॉ. सचिन कोंडेकर, डॉ. भानुदास नरवाडे, डॉ. राजकुमार पोकलवार, डॉ. सुरेश काशिदे, प्रा. गणेश क्यादारे, प्रा. विनोद काळे, अधीक्षक गोविंद जोशी, प्रशांत चौव्हाण, अशोक मामीडवार, प्रकाश सोनकांबळे, किशन पांचाळ आदींनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner